सत्र तिसरे : दुपारी ०२.३० ते ०४.००

विषय : अण्णा भाऊ साठे यांचा वाटेगाव ते रशिया प्रवास

- वक्ते : डॉ. शरद गायकवाड
  मराठी विभागप्रमुख, महावीर कॉलेज, कोल्हापूर

विषय : अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील क्रांतीकारी नायक

- वक्ते : डॉ. गिरीश मोरे
  सहयोगी प्राध्यापक, राजर्षी शाहू आर्ट्स् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, रूकडी, कोल्हापूर
- अध्यक्ष : डॉ. संपत गायकवाड
  माजी मराठी विभाग प्रमुख, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली

सत्र चौथे : दुपारी ०४.०० ते ०५.००

❊ शोधनिबंध वाचन ❊

- अध्यक्ष : डॉ. सुभाष वाघमारे
  मराठी विभाग प्रमुख, छ. शिवाजी कॉलेज, सातारा

सत्र पाचवे : सायं. ०५.०० ते ०५.३०

❊ समारोप समारंभ ❊

- अध्यक्ष : मा. शंकरराव गाढवे
  उपाध्यक्ष, जनता शिक्षण संस्था, वाई
- प्रमुख पाहुणे : डॉ. विलास काळे
  प्राचार्य, आर्ट्स् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, जि. सांगली
- प्रमुख उपस्थिती : डॉ. रमेश पोळ
  उपाध्यक्ष,शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

❊ आधारस्तंभ ❊

- मा. प्रतापराव भोसले (अध्यक्ष,जनता शिक्षण संस्था, वाई)
- मा. शंकरराव गाढवे (उपाध्यक्ष,जनता शिक्षण संस्था, वाई)
- मा. डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)
- मा. डॉ. शिवकुमार सोनाळकर (अध्यक्ष,शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर)

नोंदणी शुल्क

१. प्राध्यापकांसाठी - रूपये ५००/-
२. संशोधक विद्यार्थी, तासिका तत्त्वावरील आणि विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक - रूपये ३००/-
३. महाविद्यालयीन विद्यार्थी - रूपये १००/-
४. शोधनिबंधाबरोबरच नोंदणी शुल्क पुढील बँक खात्यावर जमा करावे.
प्राचार्य किसन वीर महाविद्यालय, वाई या नावे खाते क्रमांक - 645701704347
आय.सी.आय.सी. आय बँक शाखा वाई, IFSC Code - ICIC0006457 यावर भरावा.
५. कार्यक्रमाच्या दिवशीही नोंदणीशुल्क भरता येईल.

❊ सहभाग नोंदणी संपर्क ❊

प्रा. चंद्रशेखर भारती
मो.नं. ९५६१४४४१५१

प्रा. रेश्मा पाटील
मो.नं. ९५५२२९७४०७

मा. प्राचार्यांना विनंती

आपल्या महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांना या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी पाठवून सहकार्य करावे.

बुक-पोस्ट

प्रति,
मा.प्राचार्य / मराठी विभाग प्रमुख

प्रेषक
डॉ. चंद्रशेखर येवले
प्राचार्य
किसन वीर महाविद्यालय, वाई
ता. वाई, जि. सातारा (महाराष्ट्र),पिन- ४१२८०३

जनता शिक्षण संस्थेचे

किसन वीर महाविद्यालय, वाई

ता. वाई, जि. सातारा पिन : ४१२८०३
फोन : (०२९६७) २२०१३०
ई-मेल wai161.cl@unishivaji.ac.in

देशभक्त किसन वीर

सस्नेह निमंत्रण

अण्णा भाऊ साठे

किसन वीर महाविद्यालय, वाई, मराठी विभाग
आणि
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
यांच्या संयुक्त विद्यमाने
मराठी विषयाचे एक दिवसीय

राष्ट्रीय चर्चासत्र

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान

सोमवार दि. ३० डिसेंबर २०१९



स्थळ : किसन वीर महाविद्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा पिन : ४१२ ८०३

|| आपले स्नेहांकित ||

डॉ. चंद्रकांत कांबळे
मराठी विभाग प्रमुख, संयोजक
मो. ९४०३३४४५७६

डॉ. धनंजय निंबाळकर
मराठी विभाग, सहसंयोजक
मो. ९८२२७६९१७६

डॉ. संग्राम थोरात
मराठी विभाग, सहसंयोजक
मो. ९६०४०४६०८४

डॉ. चंद्रशेखर येवले
प्राचार्य
किसन वीर महाविद्यालय, वाई
मो. ९८५०४१९३७५

तीर्थक्षेत्र वाई

महाबळेश्वरच्या पायथ्याशी, निसर्गाच्या कुशीत, कृष्णाकाठच्या काठावर वसलेले सातारा जिल्ह्यातील एक पवित्र तीर्थक्षेत्र, सर्वधर्म अध्ययनाचे केंद्र, मराठी विश्वकोश निर्मितीचे ठिकाण आणि दक्षिण काशी म्हणून वाईची किर्ती सर्वत्र आहे. काशीविश्वेश्वर, महागणपती, महालक्ष्मी, महाविष्णू इत्यादी देवतांची प्रथेने दगडी देवालये, कृष्णेच्या तीरावरील भव्य दगडी घाट, प्राक्पाठशाळा ही वाईतील प्रसिध्द ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे आहेत. तसेच मेणवली येथील नाना फडणवीसांचा ऐतिहासिक वाडा, भोगाव येथील वामन पंडितांचे समाधी स्थळ, लोहारे येथील प्राचीन बौद्ध लेणी, पाचगणी येथील टेबललँड, क्षेत्रमहाबळेश्वर, धोम धरण व मांढरदेव गड ही वाई पंचक्रोशीतील आजूबाजूची प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या बी. जी. शिर्के, शाहीर कृष्णराव साबळे व तामणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर ह्या सन्मानीय व्यक्ती वाईतील. आद्य मराठी कादंबरीकार लक्ष्मणशास्त्री हळबे, स्वामी केवलानंद सरस्वती, इतिहास संशोधक ग. ह. खरे, दलितमित्र रा. ना. चव्हाण, कादंबरीकार रविंद्र भट यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक कार्याने पावन झालेली ही भूमी आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

जनता शिक्षण संस्था, वाई

देशभक्त किसन महादेव तथा आबासाहेब वीर यांनी ज्येष्ठ विधायक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मा. प्रतापराव भोसले, मा. लक्ष्मणराव पाटील आदी सहकाऱ्यांना बरोबर घेवून वाई येथे १९६७ मध्ये जनता शिक्षण संस्थेची स्थापना केली. तेव्हापासून आजतागायत 'उजाडाया आलो वाटा' या ध्येयाने प्रेरित होऊन एक महाविद्यालय आणि सात माध्यमिक विद्यालये इतक्या कार्यक्षेत्रात ही संस्था आपले शैक्षणिक कार्य उत्कृष्टपणे करीत आलेली आहे. वाई तालुक्यातील बहुजनांना शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध आणि संपन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे.संस्थेच्या उपरोक्तीनमध्ये विद्यमान अध्यक्ष मा. श्री. प्रतापराव भोसले (भाऊ), मानजी उपाध्यक्ष कै. लक्ष्मणराव जाधव-पाटील (ताया), विद्यमान उपाध्यक्ष मा. श्री. शंकरराव गाढवे व सर्व पदाधिकारी यांचे मोलाचे योगदान लाभलेले आहे.

किसन वीर महाविद्यालय, वाई

किसन वीर यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सहकार्याने प्राक्पाठशाळा मंडळाच्यावतीने २० जून १९६२ रोजी 'भानाय व वाणिज्य महाविद्यालय' या नावाने हे महाविद्यालय सुरू केले, नंतर १९६७ मध्ये किसन वीरांनी प्राक्पाठशाळा मंडळाकडून ते जनता शिक्षण संस्थेकडे हस्तांतरित केले. किसन वीरांच्या पश्चात सन १९८० मध्ये महाविद्यालयाचे 'किसन वीर महाविद्यालय' असे नामकरण करण्यात आले. केवळ ९ विद्यार्थी संख्येने सुरू झालेले हे महाविद्यालय पुढे सतत वाढत जाऊन आज ही संख्या सहा हजारांच्यावर पोहोचली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या या महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता,क्रीडा,सांस्कृतिक,राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना इ. प्रकारांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात नावलौकिक मिळविलेला आहे. महाविद्यालयाच्या 'कृष्णाई' या नियतकालिकाला चौदा वेळा विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळालेला आहे. सुमारे दीड एकरांच्या निसर्गरम्य परिसरात या महाविद्यालयासाठी अनेक इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. पदवी व पदव्युत्तर शिक्षणार्थ्यांची सोय, सुसज्ज ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, आठ एकरांचे भव्य क्रीडांगण यावंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र, आत्मनिर्भर शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या सर्व सोयी-सवलतींसह मोफत जय किसान वसतिगृह, मुलींचे वसतिगृह, इनडोअर स्पोर्टस हॉल व व्यायामाळा इत्यादी सोयी सुविधांनी हे महाविद्यालय परिपूर्ण आहे. गेल्या अर्धशतकाहून अधिक वर्षे 'उजाडाया आलो वाटा' या संस्थेच्या ब्रीदवाक्याशी कटीबध्द राहून हे महाविद्यालय ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. वाई तालुक्याच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासात या महाविद्यालयाचे मोठे योगदान आहे.

मराठी विभाग

महाविद्यालयातील मराठी विभाग हा महाविद्यालयाच्या स्थापनेपासून कार्यरत आहे. जून १९४२ पासून येथे मराठीच्या पदव्युत्तर अध्यापनाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अनेक सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुखांनी मराठी भाषा व साहित्य संशोधनाची प्रदीर्घ परंपरा विकसित केली आहे. तसेच विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाचे नाव सर्वदूर पोहोचविले आहे. ही यशाचा वारसा विभागातील विद्यमान प्राध्यापकांनी सलाम पुढे चालू ठेवला आहे. विभागातील प्राध्यापकांनी शोधप्रबंधिका, शोधप्रबंध, विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेले संशोधन प्रकल्प असा प्रकारचे संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे.

चर्चासत्राविषयी

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे थोरसत्र साहित्यिक होते. १९४२ सालापासून त्यांनी स्फूट लेखनाला सुरुवात केली. पोवाडे, लावण्या, गण, वगनाट्ये, छक्कडे, किसान गीते, मजूर गीते, कथा, कादंबरी, प्रवासवर्णन इत्यादी प्रकारांमध्ये लेखन केले. आपल्या साहित्य आणि साहित्यिकेच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधनाचे मोठे काम केले आहे. १ ऑगस्ट २०११ ते ३१ जुलै २०२० हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर किसन वीर महाविद्यालयातील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान' - या चर्चासत्राचे उपविषय

१. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील क्रांतीकारी नायक
२. अण्णा भाऊ साठे व मार्क्सवाद
३. दलित साहित्य आणि अण्णा भाऊ साठे
४. पटकथाकार अण्णा भाऊ साठे
५. अण्णा भाऊंच्या कथेतील जीवन संघर्ष
६. अण्णा भाऊंच्या साहित्यातील विद्रोही नायिका
७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद
८. अण्णा भाऊ साठे यांची समाजप्रबोधनात्मक वगनाट्ये
९. अण्णा भाऊ साठे यांच्या लावण्या व पोवाडे
१०. अण्णा भाऊ साठे यांचा वाटेगांव ते रशिया प्रवास
दिलेले विषय हे दिशादर्शक असून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान या विषयाशी निगडीत कोणत्याही विषयावर शोधनिबंध लिहिता तरी चालेल.

शोधनिबंध विशेषांक

चर्चासत्राच्या निमित्ताने प्रगट झालेले शोधनिबंध ISSN No. प्राप्त संशोधन पत्रिकेत
प्रकाशित करण्यात येतील. मराठीसंस्कृत- कृतिदेव- १० फॉन्टसाईज १४ Single Line
Space असा आवश्यक आहे. शोधनिबंधाची संख्यादोन १५०० शब्द इतकी असेल. (शोधनिबंध Word file व PDF मध्ये पाठवावा)
प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आपले शोधनिबंध दि. २५ डिसेंबर २०१९ पर्यंत पोहचतील असा बेताने या Email पत्त्यावर
पाठवावेत (Eamil ID - wai161.cl@unishivaji.ac.in आणि kvmmarathi@gmail.com)

❊ कार्यक्रम पत्रिका ❊

सोमवार दि. ३० डिसेंबर २०१९
सकाळी ९ ते १०.३० नावनोंदणी व अल्पोपहार

❊ सत्र पहिले : सकाळी ११.०० ते १२.३० ❊

• उद्घाटन समारंभ •

- उद्घाटक व अध्यक्ष : मा. प्रतापराव भोसले (भाऊ)
  अध्यक्ष, जनता शिक्षण संस्था, वाई
- प्रमुख पाहुणे : डॉ. दत्ता पाटील
  अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- बीजभाषक : डॉ. आनंद पाटील
  माजी इंग्रजी विभाग प्रमुख
  गोवा विद्यापीठ,गोवा
- प्रमुख उपस्थिती : डॉ. प्रकाश दुकळे
  सचिव,शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
  सर्व पदाधिकारी,जनता शिक्षण संस्था, वाई

सत्र दुसरे : दुपारी १२.३० ते १.३०

विषय : अण्णा भाऊ साठे यांचे मराठी साहित्यातील योगदान

- वक्ते : डॉ. विश्वनाथ शिंदे
  चेअर प्रोफेसर, म. फुले अध्यासन
  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- अध्यक्ष : डॉ. मनोहर जाधव
  सिनिअर प्रोफेसर, मराठी विभाग
  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

❊ भोजन : १.३० ते २.३० ❊